# प्रेस नोट दिनांक ०३/१०/२०१८

**शिवाजीनगर न्यायालयातील न्यायाधिशांच्या घरी घरफोडी करणाऱ्या बालगुन्हेगारांना अटक.....बालगुन्हेगारांकडुन चोरीच्या ५ चारचाकी, ३ दुचाकी, गाडया जप्त, २ घर फोडया असे १० गुन्हे उघडकीस आणुन एकुण १०,५५,०००/- रु.किंमतीचा मुददेमाल जप्त हडपसर पोलीसांची कारवाई.**

दिनांक ०२/१०/२०१८ रोजी हडपसर पोलीस स्टेशन येथील वाहनचोरीच्या अनुषंगाने हडपसर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना कवडीपाट टोळ नाका येथे तीन संशयित इसम एका टि व्ही एस वेगो गाडी नं. एम एच १२ वरुन फिरताना मिळुन आले त्यांचेकडे गाडीची कोणतीही कागदपत्रे नसल्याने तपास पथकाने सदर हडपसर व रामटेकडी भागात राहणाऱ्या ०३ बालगुन्हेगारांना ताब्यात घेतले असुन त्यांचे कडे चौकशी केली असता त्यांनी सदर मोटार सायकल हि हडपसर येथुन ७ ते ८ महीन्यापुर्वी चोरी केली असल्याचे सांगितले म्हणुन त्यांचे कडे अधिक कसुन तपास करता त्यांनी तपासा दरम्यान यापुर्वी **हडपसर येथुन १ मारुती झेन, १ मारुती अल्टो, वानवडी येथुन १ मारुती इको कार, लोणीकंद येथुन १ अल्टो कार, चंदननगर येथुन १ हुंदाई सँट्रो कार व इतर ३ दुचाकी** अशा **एकुण ५ चारचाकी गाडया व ३ दुचाकी** गाडया चोरल्याचे सांगितले. सदर आरोपी हे सदर चारचाकी गाडया हया घर फोडी करण्याकरीता वापरत असल्याचे तपासमध्ये निष्पन्न झाले आहे. त्यामध्ये लोणीकंद येथील एक ६५,००० रुपयांची घर फोडी व एक **शिवाजीनगर न्यायालयात प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी म्हणुन काम करणाऱ्या न्यायाधिशांच्या हडपसर येथील राहत्या घरी दिनांक २६/०९/२०१८ रोजी घरामध्ये ५५,०००/- रु.**ची घर फोडी झाली होती सदर घर फोडी वरील बालगुन्हेगारांनी केल्याचे निष्पन्न झाले असुन सदर घर फोडयामधुन मिळणारे पैसे हे ते मौजमजेसाठी वापरत असल्याचे विधिसंघर्षित बालकांनी सांगितले आहे. सदर विधिसंघर्षित बालक हे गेले १० महीने घर फोडी व वाहनचोरीचे गुन्हे करीत आहेत.

सदर बालगुन्हेगारांकडुन हडपसर पोलीस स्टेशन तपास पथकाने आतापर्यंत **एकुण ५ चारचाकी व ३ दुचाकी** जप्त केलेली आहे.

सदर बालगुन्हेगारांकडुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

१) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१०७/२०१८ भा.द.वि.क.३७९
२) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१०७४/२०१८ भा.द.वि.क.३७९
३) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१११४/२०१८ भा.द.वि.क.३७९

४) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१०३४/२०१८ भा.द.वि.क.३७९

५) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१०८७/२०१८ भा.द.वि.क.४५४,३८०

६) चंदननगर पोलीस स्टेशन गु.र.नं.१८४/२०१८ भा.द.वि.क.३७९

७) वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ४६५/२०१८ भा.द.वि.क.३७९

८) लोणीकंद पोलीस स्टेशन गु.र.नं.१००१/२०१८ भा.द.वि.क.३७९

९) लोणीकंद पोलीस स्टेशन गु.र.नं.१००२/२०१८ भा.द.वि.क.४५४,३८०

१०)यवत पोलीस स्टेशन गु.र.नं.९५३/२०१८ भा.द.वि.क.३७९

येणेप्रमाणे गुन्हे उघडकीस आणुन एकुण १०,५५,०००/-( दहा लाख पच्चावन्न हजार ) रु.किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

**सदर कामगिरी हि मा.अपर पोलीस आयुक्त सो गुन्हे श्री देशपांडे सो, प्रकाश गायकवाड, मा.पोलीस उप आयुक्त सो परि.५, सुनिल देशमुख सपोआ हडपसर विभाग, सुनिल तांबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोनि कुंभार, हडपसर पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सपोनि चव्हाण, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोना/प्रताप गायकवाड, पोना/विनोद शिवले, पोशि/नितीन मुंढे, अकबर शेख, शशिकांत नाळे, युसुफ पठाण,राजेश नवले यांनी केली आहे.**